# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस.के.बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२८

दुरध्वनी : ०२२-२४२२४४३८ । २४२२१५५८

ईमेल : admin@siddhivinayak.org । info@siddhivinayak.org

वेब : www.siddhivinayak.org

श्रीसिध्दिविनायक


दि. २९/०६/२०२४

## दरपत्रके मागविण्यासंदर्भात सूचना

विषय :– खरेदी विभागात सन २०२४–२५ या वर्षासाठी महाप्रसाद विभागात नियमित स्वयंपाकासाठी लागणारा भाजीपाला पुरवठा करण्याबाबत.

सन २०२४–२५ या वर्षासाठी महाप्रसाद विभागात नियमित स्वयंपाकासाठी लागणारा भाजीपाला खरेदी करण्यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. वरील कामाकरीता अटी व शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाउनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा दिनांक | : | शनिवार, दि. २९ जून, २०२४ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : | बुधवार, दि. ०३ जुलै, २०२४ |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : | गुरुवार, दि. ०४ जुलै, २०२४ |

**अटी व शर्ती :–**

१) BOQ मध्ये नमूद निर्देशाप्रमाणे (Specification) भाजीपाला पुरवठा करण्यासाठी (तांत्रिक लिफाफा व मूल्य लिफाफा) यानुसार दोन मोहोरबंद लिफाफे सादर करावेत एकत्रित भरलेला तांत्रिक व मूल्य लिफाफा स्विकारला जाणार नाही.

२) दरपत्रक भरताना दरपत्रकातील मूल्य लिफाफा (BOQ) नमूदप्रमाणे रक्कम भरावी.

३) दरपत्रकदाराने मोहरबंद दरपत्रकासोबत साक्षांकित करुन सादर करावयाची कागदपत्रे खालीलप्रमाणे तांत्रिक लिफाफ्यामध्ये असणे आवश्यक आहे. अन्यथा दरपत्रकधारकाला अपात्र ठरविण्यात येईल.
- पॅनकार्ड क्रमांक.
- सेवाकर जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र.
- कंपनी नोंदणी दाखला/ट्रेडिंग लायसन्स.

४) दरपत्रक सादर करताना कपंनीचे नाव, संपूर्ण पत्ता व भ्रमणध्वनी स्पष्टपणे नमूद करावा.

५) मान्य दरानेच भाजीपाला पुरवठा करावा लागेल. कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही/ मागता येणार नाही. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

६) निविदाधारकाने भाजीपाला स्वखर्चाने न्यासाच्या महाप्रसाद विभागात वा आवश्यकतेनुसार न्यासाकडून कळविण्यात येईल अशा ठिकाणी पॅकींगसह मंदिरात पोहोच करावा लागेल. न्यासाकडून वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही.

७) दरपत्रकामध्ये (जीएसटी वगळून) प्रती किलो दराचा उल्लेख करावा. सरकारी नियमाप्रमाणे आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल.

८) उपरोक्त अटी व शर्तीमध्ये काही बदल, सुधारणा करण्याचा वा जादा अटी व शर्ती विहित करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाही.

९) कोणतेही कारण न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल .

१०) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकदारकाचे दरपत्रक निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

११) दरपत्रके भरतांना आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. जर एखादे कागदपत्र दरपत्रक उघडण्याच्या वेळी जोडण्यात आलेले नसल्यास दरपत्रकधारकाने सदर कागदपत्रे ३ दिवसांत उपलब्ध करून देण्याचे हमीपत्र सादर केल्यानंतर विहित कालावधीत कागदपत्रे उपलब्ध करण्याच्या अधिन राहून दरपत्रकधारकाला पात्र ठरविण्यात येईल. दरपत्रकधारकाने कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्यास त्याला अपात्र ठरविण्यात येईल.

१२) हमीपत्र सादर केल्यानंतर उपलब्ध करून द्यावयाची कागदपत्रे ही त्या कालावधीपूर्वीची असावीत अन्यथा दरपत्रकधारकास अपात्र ठरविण्यात येईल.

१३) हमीपत्र सादर केल्यानंतर दरपत्रकधारक अपात्र ठरल्यास तो जर एल–१ असेल तर सदर पुरवठा करण्याचे काम एल–२ ला देण्यात येईल.

१४) पुरवठा करण्यात आलेल्या भाजीपाल्यांचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात येईल. भाजीपाला पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१५) मागणीनुसार माल स्विकारला जाईल तसेच मागणीपेक्षा जास्त आलेला माल स्विकारला जाणार नाही. मालाचे परिमाण अंदाजे असल्याने, प्रत्यक्षात कमी–जास्त मागणी होवू शकेल, त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

१६) भाजीपाल्यांचा पुरवठा उत्तम व अस्सल दर्जाचा करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. दुय्यम वा कमी दर्जाचा किंवा खराब भाजीपाला स्विकारला जाणार नाही. अशाप्रकारचा पुरवठा केल्यास तो स्वखर्चाने परत घेऊन जाणे हे आपणावर बंधनकारक राहील. खराब मालाची अदायगी केली जाणार नाही.

१७) खरेदी आदेशातील वर्णनाप्रमाणेच भाजीपाल्यांचा नावाचा संपूर्ण तपशील बिल सादर करतांना बिलात असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरूपात उल्लेख करू नये अन्यथा बिल अदा केले जाणार नाही.

१८) भाजीपाल्याचा पुरवठा कालावधी समाप्त झाल्यास पुढील मोहोरबंद दरपत्रके किंवा ई–निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत भाजीपाल्याचा पुरवठा वरील मान्य दरानुसार न्यासाच्या खरेदी विभागास पोहोच करावयाचा आहे.

१९) कार्यादेशाप्रमाणे पुरवठा करीत असलेल्या भाजीपाल्यांचा केव्हाही परिक्षण करण्याचा पूर्ण अधिकार न्यासाला राहील.

Vpatil

(वीणा पाटील)

कार्यकारी अधिकारी

दिनांक –      /      / २०२४

# मूळ दरपत्रक

दरपत्रकांमध्ये खालीलबाबी अंतर्भुत करण्यात याव्या

दरपत्रकधारकाचे नाव :----------------------------------------------------

दरपत्रकधारकाचा कायमचा पत्ता :----------------------------------------------------

दरपत्रकधारकाचा कंपनी नोंदणी क्रमांक:----------------------------------------------------

जी. एस.टी.क्रमांक :----------------------------------------------------

निविदाधारकाची सही व शिक्का

7

| श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई / खरेदी विभाग | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भाजीपाला यादी | | | २०२४–२०२५ | | |
| क्र | भाजीपाला | २०२४ – २०२५ वर्षभरासाठी अंदाजे लागणारी भाजी (किलो) | प्रमाण | दर (रुपये) (कर वगळून) | वर्षभरात अंदाजे होणारी भाजीपाल्याची एकूण रक्कम (क्र.६ = ३ X ५) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| 1 | टोमॅटो | 3000 | किलो | | |
| 2 | बटाटा | 5000 | किलो | | |
| 3 | फ्लावर | 800 | किलो | | |
| 4 | मिरची | 400 | किलो | | |
| 5 | फरस बी | 150 | किलो | | |
| 6 | कोबी | 400 | किलो | | |
| 7 | वांगी | 150 | किलो | | |
| 8 | सिमला मिरची | 150 | किलो | | |
| 9 | भेंडी | 400 | किलो | | |
| 10 | शेवगा शेंगा | 150 | किलो | | |
| 11 | दुधी | 50 | किलो | | |
| 12 | वाटाणा ग्रीन पीस (मॅफको) | 600 | किलो | | |
| 13 | वाटाणा शेंगा | 50 | किलो | | |
| 14 | गवार | 50 | किलो | | |
| 15 | तोंडली | 200 | किलो | | |
| 16 | अद्रक | 450 | किलो | | |
| 17 | गाजर | 700 | किलो | | |
| 18 | काकडी | 1000 | किलो | | |
| 19 | बीट | 100 | किलो | | |
| 20 | लसूण सोल्लेली पॅकेट | 350 | किलो | | |
| 21 | कडीपत्ता | 120 | किलो | | |
| 22 | लिंबू | 300 | किलो | | |
| 23 | कच्ची केळी | 50 | किलो | | |
| 24 | ब्रोकोली | 10 | किलो | | |
| 25 | कांदा पात | 30 | किलो | | |
| 26 | रेड–यलो सिमला | 10 | किलो | | |
| 27 | सॅलेरी पंता | 5 | किलो | | |
| 28 | लाल कोबी | 50 | किलो | | |
| 29 | कारले | 150 | किलो | | |
| 30 | छोटी भरीत वांगी | 150 | किलो | | |
| 31 | मशरूम | 300 | किलो | | |
| 32 | चवळीच्या शेंगा | 40 | किलो | | |
| 33 | सुरण | 150 | किलो | | |
| 34 | बेबी कॉन | 20 | किलो | | |
| 35 | भोपळा | 100 | किलो | | |
| 36 | भजीची मिरची | 30 | किलो | | |
| 37 | शिराळा | 20 | किलो | | |
| 38 | मक्याचे दाणे | 80 | किलो | | |
| 39 | रताळे | 20 | किलो | | |
| 40 | कांदा | 3500 | किलो | | |
| 41 | पापडी | 40 | किलो | | |
| 42 | गावटी कोथींबीर | 70 | किलो | | |
| 43 | मेथी | 200 | किलो | | |
| 44 | पालक | 250 | किलो | | |
| 45 | शापू | 10 | किलो | | |
| 46 | पुदीना | 50 | किलो | | |
| 47 | लाल माठ | 200 | किलो | | |
| 48 | चवळी पालेभाजी | 200 | किलो | | |
| 49 | मुळा | 20 | किलो | | |
| 50 | समुंद्र मेथी | 80 | किलो | | |
| 51 | कैरी | 200 | किलो | | |
| 52 | अळूची पाने (भाजी) | 50 | किलो | | |
| 53 | अळूची पाने (अळूवडी) | 50 | किलो | | |
| 54 | वेफर बटाटा | 100 | किलो | | |
| 55 | लसूण कांदा | 100 | किलो | | |
| 56 | गावटी गाजर | 100 | किलो | | |
| 57 | फणस | 50 | किलो | | |
| 58 | टिंडा | 50 | किलो | | |
| 59 | डाळिंब | 20 | किलो | | |
| 60 | अननस | 50 | किलो | | |
| | वर्षभरात अंदाजे होणारी भाजीपाल्याची एकूण रक्कम | | | | |